**2019 IV 08** **0930** **Seat No.** | | | | | |

**Time : 2½ Hours** **MATHEMATICS (M)**

**Subject Code**

| S | 0 | 2 | 2 |
|---|---|---|---|

**Total No. of Questions : 8** **(Printed Pages : 12)** **Maximum Marks : 80**

***सूचना :—*** (*i*) प्रत्येक प्रमूख प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर लिहा.

(*ii*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*iii*) प्रश्नपत्रिकेतील एकूण **10** गुणांचे **8** प्रश्न आहेत.

(*iv*) **सर्व** प्रश्नांमध्ये विकल्प दिलेले नाहीत, परंतू तीन प्रश्नांमध्ये तीन गुणांचे विकल्प (उपप्रश्न) दिलेले आहेत.

(*v*) भौमितिक रचना काढताना आकृती स्पष्ट आणि योग्य मापानुसार काढा. सर्व खुणा (रेषा आणि कंस) स्पष्ट असाव्यात, त्या खोडू नका.

(*vi*) आलेख पेपर उत्तरपत्रिकेच्या शेवटच्या पानावर दिलेला आहे.

(*vii*) गणनयंत्र (Calculator) आणि गणिती सारणी वापरण्यास मनाई आहे.

1. (A) खाली दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून लिहा : 1

दोन संख्यांचा गुणाकार 864 आहे. जर त्यांचा म. सा. वि. 12 आहे तर त्यांचा ल. सा. वि. .................................. असेल.

(*a*) 12

(*b*) 72

(*c*) 852

(*d*) 876

(B) खालील प्रश्न सोडवा : 2

(i) $2x^2 - 7x - 15$ या वर्गीय बहुपदिच्या शुन्यांकांची बेरीज काढा.

(ii) $x^2 - 11x$ या वर्गीय बहुपदिचे शुन्यांक काढा.

(C) $2x^3 - 5x^2 + 8x - 5$ या बहुपदिला $g(x)$ या बहुपदिने भाग दिला असता अनुक्रमे $(2x - 3)$ व $(3x - 2)$ हे भागाकार व बाकी मिळतात तर $g(x)$ काढा. 3

(D) सिद्ध करा कि $\sqrt{7}$ ही अपरिमेय संख्या आहे. 4

2. (A) खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा : 1

जर $P(E) = 0.07$ आहे तर 'E नसण्याची' संभाव्यता .................... असेल.

(a) 0.03

(b) 0.93

(c) 1.00

(d) 1.07

(B) व्यवस्थित पिसलेल्या 52 पत्त्यांच्या संचातून एक पत्ता काढला असता खालील संभाव्यता काढा : 2

(i) काढलेला पत्ता एक्का असेल

(ii) काढलेला पत्ता लाल चेहरा असलेला पत्ता असेल.

(C) खालीलपैकी कोणत्याही **एका** वर्गीय समिकरणाची मुळे काढा : 3

(i) $7x^2 - 17x + 6 = 0$ (अवयव पद्धतीने)

(ii) $3x^2 + 10x - 8 = 0$ (वर्गीय सुत्र पद्धतीने)

(D) दोन पाईप A व B द्वारे एकत्र पाणी भरले असता एक टाकी पूर्ण भरायला $3\frac{1}{3}$ मिनिटे लागतात. पण जर A व B या पाईप द्वारे स्वतंत्र पणे पाणी भरले तर तीच टाकी पूर्ण भरायला पाईप 'B' ला पाईप 'A' पेक्षा 5 मिनिटे जास्त वेळ लागतो, तर प्रत्येक पाईपला स्वतंत्रपणे पाण्याची टाकी भरायला किती वेळ लागेल ते काढा. 4

3. (A) खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा : 1

तीन वर्षानंतर दोन मित्रांचे वय अनुक्रमे $x$ व $y$ वर्षे असेल तर दोन वर्षांपूर्वी त्यांच्या वयाची बेरीज .................................. होती.

(*a*) $x + y + 10$

(*b*) $x + y + 5$

(*c*) $x + y - 10$

(*d*) $x + y - 5$

(B) खाली दोन चलातील रेषीय समीकरणांची जोडी दिलेली आहे. 2

$$2x + 3y = 7$$

$$(k + 1)x + (2k - 1)\, y = 4k + 1.$$

दिलेल्या समीकरणांवरून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*i*) अनंत उकली असण्याची अट लिहा.

(*ii*) '$k$' ची किंमत काढा.

(C) खालीलपैकी कोणत्याही **एका** रेषीय समीकरणांच्या जोडीची उकल काढा : 3

(i) $3x - 2y = 5$ व

$5x + 3y = 21$ [निरसन पद्धतीने]

(ii) $2x + 5y = 29$ व

$7x - 2y = 4$ [तिरकस गुणाकार पद्धतीने]

(D) खाली दिलेल्या दोन चलातील रेषीय समीकरणांची उकल आलेखाच्या साहाय्याने काढा : 4

$x + y = 8$ व

$3x - y = 4$

खालील सारणी पूर्ण करून परत लिहा :

$x + y = 8$

| | | | |
|---|---|---|---|
| $x$ | | | |
| $y$ | | | |

$3x - y = 4$

| | | | |
|---|---|---|---|
| $x$ | | | |
| $y$ | | | |

[प्रत्येक रेषेकरता कमीत कमी तीन बिंदू घ्या.]

4. (A) खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा : 1

पहिल्या 20 नैसर्गिक विषम संख्यांची बेरीज .................. आहे.

(a) 100

(b) 210

(c) 400

(d) 420

(B) खालील सारणीद्वारे एका परिसरातील 50 व्यक्तिंचे वय दिलेले आहे : 2

| वय (वर्षांमध्ये) | व्यक्तिंची संख्या |
|---|---|
| 5—15 | 10 |
| 15—25 | 12 |
| 25—35 | 15 |
| 35—45 | 13 |

वरील सारणीचा मध्यक काढा.

(C) एका विद्युत बल्ब बनविणाऱ्या कंपनीद्वारे विद्युत बल्बची निर्मिती करण्याची मर्यादा एका ठराविक संख्येने दर महिन्याला वाढत जाते. जर तिसऱ्या महिन्यामध्ये 600 विद्युत बल्बची निर्मिती झाली व सातव्या महिन्यामध्ये 800 बल्बची निर्मिती झाली तर संपूर्ण वर्षामध्ये एकूण किती विद्युत बल्बची निर्मिती झाली. ते काढा. 3

(D) खालील सारणी द्वारे, एका क्लबने 60 देणगीदारांकडून जमा केलेली देणगी दाखविलेली आहे : 4

| देणगी (₹ मध्ये) (वर्ग) | देणगीदारांची संख्या ($f_i$) | वर्ग मध्य ($x_i$) | $d_i = x_i - a$ | $f_i d_i$ |
|---|---|---|---|---|
| 0—20 | 5 | — | — | — |
| 20—40 | 12 | — | — | — |
| 40—60 | 14 | — | — | — |
| 60—80 | 15 | — | — | — |
| 80—100 | 8 | — | — | — |
| 100—120 | 6 | — | — | — |
| एकूण | $\Sigma f_i = 60$ | | | $\Sigma f_i d_i =$ — |

40 – 60 या वर्गाचा वर्गमध्य हा मानलेला मध्य '$a$' घेऊन वरील सारणी पूर्ण करून लिहा व दिलेल्या सारणीचा मध्य काढा.

5. (A) खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा : 1

'O' हे केंद्र असलेल्या वर्तुळाला 'T' या बाह्य बिंदूतून काढलेल्या TP व TQ या स्पर्शिका 'P' व 'Q' या बिंदूकडे स्पर्श करतात. जर $\angle POQ = 130°$ आहे तर $\angle PTO$ = .................................... असेल.

(*a*) 25°


(*b*) 50°

(*c*) 65°

(*d*) 130°

(B) पक्ष : बिंदू 'O' हे केंद्र असलेल्या वर्तुळाला 'Q' ह्या बाह्य बिंदूतून काढलेले QS व QT है स्पर्शिका खंड वर्तुळाला अनुक्रमे 'S' व 'T' या बिंदूत स्पर्श करतात. 3

सिद्ध करा : QS = QT




(फक्त कारणासहीत सिद्धता लिहा)

(C) बिंदू 'O' हे केंद्र व त्रिज्या 3·5 सेमी. घेऊन एक वर्तुळ काढा. वर्तुळाच्या केंद्रापासुन 8 सेमी अंतरावर 'P' हा बिंदू घ्या. कंपास व मोजपट्टीच्या साहाय्याने PA व PB अश्या दोन स्पर्शिका वर्तुळाला काढा. स्पर्शिका खंडांची लांबी मोजून लिहा. 3

(D) कंपास व मोजपट्टीच्या साहाय्याने $\Delta$ PQR असा काढा की PQ = 7 सेमी., QR = 8.5 सेमी. व PR = 6.5 सेमी आहे. नंतर $\Delta P'QR'$ असा काढा की त्याच्या $\Delta PQR$ च्या भुजांशी $\frac{3}{5}$ या प्रमाणात असतील. 3

6. (A) खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा : 1

जर cosec 3A = sec (A − 22) आहे जिथे 3A हा एक लघुकोन आहे, तर $\angle A$ = ..........................

(*a*) 11°


(*b*) 17°

(*c*) 28°

(*d*) 58°

(B) खालीलपैकी कोणताही **एक** उपप्रश्न सोडवा : 3

(*i*) $\Delta DRY$ मध्ये, $\angle R = 90°$ व cosec Y = $\frac{17}{8}$ आहे :



तर काढा :

($a$) YR ची लांबी

($b$) cot D ची किंमत

($c$) cos Y ची किंमत

($ii$) त्रिकोणमितीय गुणोत्तरांच्या किंमती घालून खालील राशींची किंमत काढा :

$$3 \tan^2 30° - 2 \sec^2 45° + \frac{1}{3}\cos 60°.$$

(C) खालील नित्यसमा सिद्ध करा : 2

$$\frac{\tan\theta + \sec\theta - 1}{\tan\theta - \sec\theta + 1} = \sec\theta + \tan\theta.$$

(D) खालील उपप्रश्न सोडवा :

($i$) A(4, 3), B(12, 5) व C(4, 6) हे शिरोबिंदू असलेल्या $\Delta$ABC चे क्षेत्रफल काढा. 2

($ii$) P(3, 4) हा बिंदू A(5, $k$) व B($k$, 7) या बिंदूपासून समान अंतरावर आहे तर '$k$' ची किंमत काढा. 2

7. (A) खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा : 1

$\Delta$ ABC मध्ये, बिंदू 'D' व 'E' हे अनुक्रमे BC व AC या भुजांवर असे आहे कि B–D–C, A–E–C व DE $\parallel$ AB. जर CE = 4 सेमी., AE = 5 सेमी. व BD = 4.5 सेमी. आहे तर BC = .......................... सेमी.


($a$) 3.6


($b$) 5.6

($c$) 8.1

($d$) 9

(B) सोबतच्या आकृतीच्या आधारे आणि दिलेल्या अटीनुसार खालील प्रमेयाची कारणासह सिद्धता लिहा : 3






पक्ष : $\Delta DEF$ मध्ये $DE^2 + EF^2 = DF^2$ आहे.

$\Delta PQR$ असा काढला आहे की $PQ = DE$, $QR = EF$ व $\angle Q = 90°$ आहे.


सिद्ध करा :

$\Delta DEF$ हा काटकोन त्रिकोण आहे.

(C) पक्ष : $\Delta ABC$ हा काटकोन त्रिकोण आहे ज्यात $\angle C$ हा काटकोन आहे. $\Delta ABC$ च्या AB ह्या भुजेला CD हा रेषाखण्ड लंब आहे.

सिद्ध करा : 3


$$\frac{1}{CD^2} = \frac{1}{BC^2} + \frac{1}{AC^2}$$




(फक्त कारणासहीत सिद्धता लिहा).

(D) दोन खांब AB व CD हे एकमेकांपासुन 50 मी. अंतरावर आहेत, व आकृतीत दाखविल्या प्रमाणे CD ची उंची AB च्या उंचीच्या दुप्पट आहे. खांबांच्या पायांना जोडणाऱ्या रेषेवर असलेल्या 'P' या बिंदूवरून AB चे टोक A व CD चे टोक 'C' कडे पाहता अनुक्रमे 30° व 60° चे उन्नतकोन तयार होतात, तर AB व CD या खांबांची उंची काढा.

($\sqrt{3} = 1.7$ घ्या) 3




8. (A) खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा : 2

(*i*) 15 सेमी त्रिज्या असलेल्या व वर्तुळाच्या केंद्राशी 36° चा कोन करणाऱ्या वर्तुळाच्या कंसाची लांबी .................... सेमी असेल.

(*a*) $3\pi$

(*b*) $5\pi$

(*c*) $15\pi$

(*d*) $30\pi$

(*ii*) $14\pi$ सेमी परिघ असलेल्या वर्तुळाचा व्यास .................................. सेमी असेल.


(*a*) 7

(*b*) 14

(*c*) 21

(*d*) 28

(B) एका खेळण्याचा खालचा भाग अर्धगोलाकृती आहे व वरचा भाग शंक्वाकृती आहे ज्यांची त्रिज्या समान आहे. जर शंक्वाकृती भागाच्या तळाची त्रिज्या 5 सेमी व खेळण्याची उंची 17 सेमी. आहे तर : 2





काढा :

(*i*) शंकूची तिरकस उंची.

(*ii*) अर्धगोलाचे वक्र पृष्ठफल ($\pi$ ची किंमत घालू नका)

(C) दिलेल्या आकृतीत एक कार्डबोर्डचा तुकडा समलंब चौकोनाच्या आकाराचा आहे ज्यात AB ∥ DC आहे व ∠BCD = 90º. 'C' हे केंद्र व 3.5 सेमी त्रिज्या घेऊन एक चतुर्थांश काढलेला आहे ज्यात AB = BC व DE = 2 सेमी आहे तर छायांकित भागाचे क्षेत्रफल काढा. $\left(\pi = \frac{22}{7}\right)$ 3




(D) एका भरीव गोलाचे पृष्ठफल 616 सेमी$^2$ आहे हा गोल वितळून त्याच्यापासुन 3·5 सेमी व्यास व 14 सेमी उंचीचे भरीव शंकू तयार केले तर एकूण किती शंकू तयार होतील ते काढा. $\left(\pi = \frac{22}{7}\right)$ 3